# नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७३/२०१९ मधील निशाणी ३२ वरील आदेश

## CNR No. : MHDH06-001286-2019.

वादींनी प्रस्तूतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादींनी प्रस्तूतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द कायमचे मनाई हुकूमासाठी व आदेशात्मक मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, दिनांक ०२/०१/२०२० रोजी निशाणी ५ वरील आदेशानंतर प्रतिवादींनी वादींची घर मिळकत क्र. ६७ या मिळकतीच्या पूर्वेवस अतिक्रमण करुन बांधकाम केले व पूर्व पश्चिम बोळ मार्ग बंद करुन त्यावर स्लॅब टाकून मार्ग बंद केला आहे. तसेच घर क्र. ६७ व ६६ मधील उत्तर दक्षिण सामाईक भिंतीचे बांधकाम करुन दिले नाही. त्यामुळे सदरची बाब न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादींनी दुरुस्ती दाव्यात दावा कलम ८अ, १०अ व विनंती कलम १३क-अ अशी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती होऊन मिळणेकामी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी खुलासा दाखल करुन सदर अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादी हे दुरुस्ती द्वारे संपुर्ण दाव्याचे स्वरुप बदलु पाहात आहेत. सदर दावा दुरुस्तीस मंजुरी दिल्यास दावा मिळकतीचे वर्णन व दाव्याचे स्वरुप बदलणार आहे.

४. अर्ज व प्रतिवादीचे खुलाश्याचे अवलोकन केले. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तूतचा दावा हा वादीच्या पुराव्यासाठी नेमलेला आहे. वादींनी प्रस्तुतचा दावा कायम स्वरुपाच्या मनाई हुकूमासाठी व आदेशात्मक मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, निशाणी क्र. ५ चा अर्ज नामंजूर झाल्यानंतर प्रतिवादींनी वादींच्या मिळकतीवर अतिक्रमण करुन बांधकाम पूर्ण केले आहे. तसेच अतिक्रमण करुन बांधकाम केले व पूर्व पश्चिम बोळ मार्ग बंद केला. सदरचे बांधकाम हे प्रतिवादींनी दावा प्रलंबित असतांना केले आहे. तसेच प्रतिवादींनी सामाईक भिंतही बांधून दिलेली नाही. त्यामुळे दावा प्रलंबित असतांना घडलेल्या घटना दाव्यात दुरुस्तीद्वारे नमूद करणे आवश्यक आहे. वादींच्या कथनाचा विचार करता वादींनी सुचीत केलेली दुरुस्ती ही उभय पक्षांच्या वाद तथ्थ्यांचे पूर्णतः निराकरण करण्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. तसेच वादींनी प्रस्तूत अर्जात नमूद केलेली

घटना दावा प्रलंबित असतांना घडल्याबाबात कथन केले आहे. तसेच अदयाप प्रस्तुत दाव्यात पुरावा सुरु झालेला नाही. तसेच प्रतिवादींना सदर दुरुस्तीबाबत कैफीयत देण्याची किंवा बाजू मांडण्याची संधी मिळणारच आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपावर कोणताही परिणाम होणार नाही. सुचीत दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची व वाद तथ्थ्यांचे पूर्णतः निराकरण करण्यासाठी आवश्यक असल्याने तसेच सुचीत दुरुस्तीमध्ये नमुद केलेली घटना दावा प्रलंबीत असतांना घडलेली असल्याने सदर दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचीत होईल असे मला वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तूत अर्ज निशाणी ३२ मागणी केल्याप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत पुढील तारखेपावेतो अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

शिंदखेडा (सं. ल. वैद्य)

दिनांक ०२/०८/२०२१ दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, शिंदखेडा